D/Noise pollution

**वाचले :-**

१) पर्यावरण व वन मंत्रालय भारत सरकार अधिसुचना नवी दिल्ली दि.१४/०२/२०००
२) महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.ध्वनीप्र/२०००/प्र.क्र.२६/ता.क.३ दि.१६/०८/२०००
३) मा.उच्च न्यायालय आदेश क्र/पीआयएल-१७३/१० सह सिव्हील ॲप्लीकेशन क्र./१२४/२०१४
४) महाराष्ट्र शासनाचे गृह विभागाकडील परीपत्रक क्र.डीआयएस०९१०/प्र.क्र.४३४/वि.शा.१ ब दि.०१/०७/२०१५
५) महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभागाकडील परीपत्रक क्र.याचिका २०१५/सं.क्र.८७८/न.वि.३४ दि.०१/०७/२०१५
६) महाराष्ट्र शासनाचे गृह विभागाकडील परीपत्रक क्र.डीआयएस०९१०/प्र.क्र.४३४/वि.शा.१ ब दि.०६/०७/२०१५
७) महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभागाकडील परीपत्रक क्र.याचिका २०१५/सं.क्र.८७८(१)/न.वि.३४ दि.०६/०७/२०१५
८) महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभागाकडील परीपत्रक क्र.याचिका २०१५/सं.क्र.८७८(२)/न.वि.३४ दि.०६/०७/२०१५
९) महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभागाकडील परीपत्रक क्र.न्यायाप्र २०१६/प्र.क्र.१२७/न.वि.१७ दि.१९/११/२०१६

क्र/गृह/का.१/टे.३/मंडप(मेंडॉल)तपा.पथक/एस.आर.०३/१७
जिल्हाधिकारी कार्यालय पालघर
दि. ०९/०१/२०१७

**आदेश:-**

ज्याअर्थी समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर उभारण्यात येत असलेल्या मंडपा संदर्भात ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) २००० ची अंमलबजावणी करण्या संदर्भात डॉ.महेश बेडेकर यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१७३/२०१० सोबत सिव्हील ॲप्लीकेशन क्र. १२४/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.१३/०३/२०१५ व दि.२४/०६/२०१५ रोजी सविस्तर आदेश दिलेले आहेत.

ज्याअर्थी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शासनाच्या नगरविकास विभाग यांचेकडील उपोद्घातातील अ.क्र.९ अन्वये ध्वनी प्रदुषण नियमांच्या तक्रारींची दखल घेण्याकरीता ज्या स्वरुपाची तक्रार निवारण यंत्रणा राहील त्याच स्वरुपात तात्पुरत्या स्वरुपात रस्त्यावर/पदपथावर रचना उभारण्या संदर्भात तक्रार निवारण यंत्रणेची निर्मिती करावी. तक्रारींची दखल घेण्याकरीता प्रभाग निहाय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी.

तसेच ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शासनाच्या नगरविकास विभाग यांचेकडील उपोद्घातातील अ.क्र.९ मध्ये दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी महानगरपालिका क्षेत्रात संबंधित आयुक्त व नगरपालिका क्षेत्रासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील असे नमूद केले आहे.

त्याअर्थी, मी **अभिजीत बांगर, जिल्हाधिकारी पालघर,** उपोद्घातातील अ.क्र.९ मध्ये दिलेल्या शासन निर्देशान्वये नगरपालिका क्षेत्रातील कार्यक्षेत्रात समारंभ व उत्सवाच्या प्रसंगी उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या मंडपांना किंवा अन्य बांधकामांना भेटी देऊन तपासणी करणेकामी खालील तक्त्यात विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यक्षेत्रात तपासणी करणेकामी नेमणूक करीत आहे.

| अ.क्र. | पथक प्रमुख | पथकातील सदस्यांचे पदनाम | नेमून दिलेले कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | तहसिलदार पालघर | १) पोलीस निरीक्षक, पालघर<br>२) मुख्याधिकारी, नगरपरीषद पालघर | नगरपरिषद पालघरच्या हद्दीतील क्षेत्र |
| २ | तहसिलदार डहाणू | १) पोलीस निरीक्षक, डहाणू<br>२) मुख्याधिकारी, नगरपरीषद डहाणू | नगरपरिषद डहाणूच्या हद्दीतील क्षेत्र |
| ३ | तहसिलदार जव्हार | १) पोलीस निरीक्षक,जव्हार<br>२) मुख्याधिकारी, नगरपरीषद जव्हार | नगरपरिषद जव्हारच्या हद्दीतील क्षेत्र |
| ४ | तहसिलदार तलासरी | १) पोलीस निरीक्षक, तलासरी<br>२) मुख्याधिकारी, नगरपंचायत तलासरी | नगरपंचायत तलासरीच्या हद्दीतील क्षेत्र |
| ५ | तहसिलदार विक्रमगड | १) पोलीस निरीक्षक, विक्रमगड<br>२) मुख्याधिकारी, नगरपंचायत विक्रमगड | नगरपंचायत विक्रमगडच्या हद्दीतील क्षेत्र |
| ६ | तहसिलदार मोखाडा | १) पोलीस निरीक्षक, मोखाडा<br>२) मुख्याधिकारी, नगरपंचायत मोखाडा | नगरपंचायत मोखाडाच्या हद्दीतील क्षेत्र |